रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३६३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# घरकुल योजनेत गैरव्यवहार

## अभियंत्याच्या मनमानी कारभाराची सरपंचांकडून तक्रार

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा पंचायत समितीमधील घरकुल विभागाच्या भ्रष्ट कारभाराची प्रकरणे पुन्हा एकदा समोर येत आहेत. येथे कार्यरत असलेले एक गृहनिर्माण अभियंता घरकुल लाभार्थ्यांकडून परस्पर पैशांची वसुली करत असल्याचा आरोप पोखरी केंधळे गावच्या सरपंच अनिता मधुकर केंधळे यांनी केला आहे. त्यांनी या संदर्भात गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार करून संबंधित अभियंत्याच्या बदलीची मागणी केली आहे.

**काय आहे प्रकरण?**

पोखरी केंधळे येथील घरकुल लाभार्थ्यांकडून गृहनिर्माण अभियंत्याने सरपंचाला कोणतीही कल्पना न देता पैशांची वसुली करून घरांचे फोटो काढल्याचा आरोप आहे.

सरपंच अनिता केंधळे यांनी याबाबत विचारणा केली असता, त्या अभियंत्याने उद्धट उत्तरे दिली. मी माझ्या मनाचा मालक आहे, मला कोणाकडून पैसे घ्यायचे आणि कोणाचे फोटो काढायचे हे मी ठरवेल. तुम्ही मला विचारणारे कोण? अशा भाषेत त्याने सरपंचांशी गैरवर्तन केले.

यापूर्वीही देवगाव खवणे, केहाळ वडगाव, नायगाव यांसारख्या अनेक गावांमध्ये घरकुल लाभार्थ्यांची लूट होत असल्याच्या तक्रारी गटविकास अधिकाऱ्यांकडे दाखल झाल्या आहेत. परंतु, या तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याने कर्मचाऱ्यांचा गैरकारभार वाढल्याचा आरोप आहे.

या गंभीर प्रकाराची दखल घेऊन, मंठा पंचायत समितीमधील कारभाराकडे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पी.एम. मित्रू यांनी लक्ष देण्याची गरज असल्याचे सरपंच अनिता केंधळे यांनी म्हटले आहे. त्यांनी भ्रष्ट अभियंत्याची तातडीने बदली करण्याची मागणी केली आहे.

# परतूरात अवैध तलवारीसह तीघे ताब्यात; गुन्हा दाखल



**परतूर । प्रतिनिधी -** शहरात अवैधरित्या धारदार तलवारी व शस्त्र बाळगणाऱ्यांची माहिती काढून त्यावर कारवाई करण्याचे आदेश मा.पोलिस अधीक्षक, अजयकुमार बंसल.यांनी दिलेले आहेत.त्यावरुन पोलीस निरीक्षक,एस.बी.भागवत यांनी पोलीस ठाणे परतूर येथील अधिकारी अंमलदार यांचे अवैधरित्या धारदार तलवारी व शस्त्र बाळगणाऱ्या इसमांवर कारवाई करण्यासाठी पथके नेमलेली होती.दि.०८ ऑगस्ट रोजी पोलीस निरीक्षक, भागवत यांना माहिती मिळाली की पारडगाव रस्त्याच्या बाजूला व रेल्वे स्टेशन समोर एका घराम ध्ये काही अवैधरित्या धारधार तलवारी बाळगत आहेत असे खात्रीशीर माहिती मिळाली होती. त्यावरून भागवत यांनी पोलीस ठाणे परतूरचे दोन पथक अवैधरित्या धारदार तलवारी बाळगणाऱ्या इसमांना पकडण्यासाठी सुचना देवून आदेशीत केले होते.पथकातील अधिकारी अंमलदार यांनी पारडगाव रोडवरील घरामध्ये जावून पहाणी केली असता इसम नामें संतोष लक्ष्मण काळे वय ३२ वर्ष रा.परतूर पारडगाव रोड,व एक महीला असे दोघे, तीन अवैधरित्या धारदार तलवारी बाळगताना मिळून आले.आणि रेल्वे स्टेशन समोर एका पत्र्याच्या शेडमध्ये इसम नामे गिरधारी दादाराव पवार.वय ४३ रा.रेल्वे स्टेशन समोर परतूर हा एक अवैधरित्या तलवार बाळगताना मिळून आला आहे. तीन्ही आरोपी विरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची काम गिरी मा. पोलीस अधीक्षक, अजयकुमार बंसल.मा.अपर पोलीस अधीक्षक, आयुष नोपाणी. उपविभागीय पोलीस अधिकारी, विशाल खांबे. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे परतुर चे पोलीस निरीक्षक, एस. बी.भागवत. पोउपनि, अमोल रावते. अंमलदार धर्मा शिंदे. किरण मोरे. गजानन राठोड. विजय जाधव. नरेंद्र चव्हाण. दशरथ गोपनवाड. पवनकुमार धापसे. कल्पना धडे. आय.टी. सेल अंमलदार सागर बाविस्कर यांनी केलेली आहे.

# जालना येथे पार पडली 'मान्सून अंडर-१४ क्रिकेट लीग २०२५'

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालना आणि साई काणे क्रिकेट अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने दानकुवर महिला महाविद्यालयाच्या मैदानावर 'मान्सून अंडर-१४ क्रिकेट लीग २०२५' यशस्वीरीत्या पार पडली. या स्पर्धेत जालना शहरातील पाच युवा संघांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेचे आयोजन लीग पद्धतीने करण्यात आले होते. प्रत्येक सामन्यातील उत्कृष्ट खेळाडूंना 'मॅन ऑफ द मॅच' चा पुरस्कार देण्यात आला. स्पर्धेच्या शेवटी, स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या खेळाडूंना 'बॅट्समन ऑफ द टूर्नामेंट' आणि 'बॉलर ऑफ द टूर्नामेंट' या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

यात बॅट्समन ऑफ द टूर्नामेंट' कान्हा उपाध्याय यास तर बॉलर ऑफ द टूर्नामेंट' पुरस्काराने साद शेख यास गौरविण्यात आले.


या समारंभासाठी जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डव्होकेट नरेंद्र देशपांडे, खजिनदार डव्होकेट श्रीकांत देशपांडे, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अपेक्स मेंबर व टूर्नामेंट कमिटीचे सेक्रेटरी राजू काणे आणि जॉईंट सेक्रेटरी अभिजीत चव्हाण तसेच संतोष भारोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.



याप्रसंगी जालना जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील अनेक युवा क्रिकेटपटू आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेमुळे जालना जिल्ह्यातील तरुण खेळाडूंना त्यांच्या कौशल्यांचे प्रदर्शन करण्याची एक चांगली संधी मिळाली.

# परतुर इस्कॉन च्या वतीने आज श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन

**परतूर । प्रतिनिधी-** येथील आंतरराष्ट्रीय कृष्ण भावना मृत संघ इस्कॉन यांच्यावतीने श्रीकृष्ण जन्माष्टमी महामहोत्सव २०२५ चे आयोजन दिनांक १० ऑगस्ट २०२५ रविवार रोजी केले आहे सदरील कार्यक्रमात मराठवाडा इस्कॉन टेम्पल मॅनेजमेंट कमिटी हेड असलेले बालब्रह्मचारी श्री बलदेव प्रभुजी यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.



या महोत्सवामध्ये दुपारी २ ते ४ या वेळेत नगर संकेतन सायंकाळी ४:३० ते ५:३० या वेळेत श्री अभिषेक, सायंकाळी ५:३०ते ६:३० वाजता सांस्कृतिक कार्यक्रम, सायंकाळी ६:३० ते ७:३० प्रवचन, ७:३० वाजता महाआरती व यानंतर सायंकाळी ८:00वाजता महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन श्री वरद विनायक मंगल कार्यालय मेन रोड परतुर येथे करण्यात आले आहे.

तसेच इस्कॉन च्या वतीने प्रत्येक गुरुवार व एकादशी या दिवशी सत्संग व महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला जातो सदरील कार्यक्रम सायंकाळी ६:३० ते ८ यादरम्यान डॉक्टर संदीपजी चव्हाण यांचे श्रीकृष्ण हॉस्पिटल सातोणकर मळा येथील तळमजला ठिकाणी आयोजित केले जाते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इस्कॉनचे सेवक सर्वश्री कैलासजी चव्हाण, डॉ. विजय राऊत, डॉ. रतन राय, ऍड, ओमप्रकाश प्रभू राऊत, सोनू हिवाळे, संजय महाराज, रतीराम प्रभुजी चव्हाण, सचिन काटे, व्यंकटेश व्यास, आशिष सुरूग, आर्यन मेहता यांच्यासह भक्त संप्रदाय परिश्रम घेत आहेत.

युवा आदर्श

स्वयंभु बहना ...

रे नात्याच्या बंधना
पारखाकरे जवाना
भेटणार कधी ताई
कोणत्या रक्षाबंधना
अंतर भेटीत पडले
जागृत सदा वेदना
सण गं सण वाटेना
दिस जाई सुनासुना
नाही ते ओवाळणे
काजळी निरांजना
काळजी भगिनीची
उदास छळते मना
मनगट सुने सुने ते
डोळ्यांत फुटे पान्हा
वाट पाहते द्रौपदी
कुठे हरवला कान्हा
ताईडीच्या घराकडे
जा रे श्रावण घना
वर्षाव कर स्नेहाचा
बरस पिवळ्या उना
समर्थ उभा ठाकलो
गं देशाच्या संरक्षणा
तू स्वयंभू बनावेस
आत्म निर्भर बहना

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

# दलित-आदिवासी भूमिहीन कास्तपट्टे नावे करा: महसूलमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाड्यातील दलित आणि आदिवासी भूमिहीन कास्तकारांना मिळालेल्या जमिनी त्यांच्या नावावर करून सातबारा उताऱ्यावर नोंद घ्यावी, अशी मागणी शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे यांनी महसूलमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. महसूल मंत्री जालना दौऱ्यावर असताना त्यांनी ही मागणी केली व त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

**मुख्य मागण्या:**

सातबारा उताऱ्यावर नोंद: शासनाने दलित-आदिवासी भूमिहीन कास्तकारांना प्रदान केलेल्या शेतजमिनी, गायरान, इनाम व सीलिंग क्टमधील जमिनींची सातबारा उताऱ्याला नोंद घेण्यात यावी. पोटखराबी दुरुस्ती: सध्या अनेक लाभार्थ्यांच्या **पान २ वर**



# जालना गणेश फेस्टीवलच्या संपर्क कार्यालयाचे आज उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** जालना गणेश फेस्टीवलच्या संपर्क कार्यालयाचे दि. १० ऑगस्ट २०२५ रविवार रोजी सकाळी ११.३० वा. होणार असून यावेळी गणेश भक्तांसह सर्वांनी उपस्थित रावावे, असे आवाहन अशोकराव आगलावे यांनी केले आहे.

या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन जालना शहर महापालिकेचे आयुक्त संतोषराव खांडेकर यांच्या हस्ते होणार असून यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उद्योजक श्री कैलाश लोया, जिल्हा व्यापारी संघाचे अध्यक्ष विनीत साहनी, जालना पीपल्स बँकेचे माजी चेअरमन तथा व्यापारी महासंघाचे शहराध्यक्ष सतिष पंच, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर निकाळजे, ॲड वाल्मिक घुगे, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी,जिल्हा कॉन्ट्रक्टर असो. चे अध्यक्ष श्रीकांत घुले तसेच अभय कुलकर्णी, अंकुश सोनवणे, जालना मर्चंट बँकेचे माजी अध्यक्ष अंकुश राऊत तसेच जगत घुगे, डेव्हिड घुमारे, ॲड. संजय काळबांडे हे **पान २ वर**

# समृद्धी बाधित शेतकरी प्रश्नावर तोडगा?

## कैलास गोरंटयाल यांच्या उपस्थितीत २१ ऑगस्टला मंत्रालयात निर्णायक बैठक

**जालना । प्रतिनिधी -**जालना-नांदेड समृद्धी महामार्गासाठी जमीन अधिग्रहित झालेल्या शेतकऱ्यांच्या मोबदल्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी २१ ऑगस्ट रोजी मुंबईत मंत्रालयात बैठक होणार आहे. माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ या बैठकीला उपस्थित राहणार असल्याची माहिती त्यांनी आज (९ ऑगस्ट) पत्रकार परिषदेत दिली. चंद्रशेखर बावनकुळे यांनी २१ ऑगस्ट रोजी गोरंटयाल यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाला मुंबईत चर्चेसाठी बोलावले आहे.

गेली सहा महिन्यांपेक्षा अधिक काळापासून जालना -नांदेड समृद्धीबाधीत शेतकऱ्यांचा संघर्ष सुरु आहे. पहिल्या टप्प्यात आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या मध्यस्थीने जालना जिल्हा प्रशासनाकडून आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले होते. मात्र, मागण्या मान्य होत नसल्याचे दिसून आल्यानंतर व आश्वासनादरम्यान दिलेला वेळ संपल्यानंतर शेतकऱ्यांनी पुन्हा आंदोलनास्त्र उगारले. गेली शंभर दिवसांपासून हे आंदोलन सुरु आहे. यातही आमदार अर्जुनराव खोतकर यांच्याकडून आज बैठक, उद्या बैठक होणार असे आश्वासन मिळत आहे. आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या केवळ आश्वासन मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांचा हिरमोड झाला असून त्यांनी आता थेट अरबी समुद्रात उडी मारणार असल्याचे सांगितले आहे.

त्यातच शुक्रवार (दि ९) रोजी महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे जालना दौऱ्यावर असतांना माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या निवासस्थानी शेतकरी व माजी आमदार गोरंट्याल यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न श्री बावनकुळे यांच्याकडे मांडले. त्यावर त्यांनी येत्या २१ ऑगस्ट रोजी मंत्रालयात बैठक लावून त्यावर तोडगा काढणार असल्याचे आश्वासन दिले. माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या मध्यस्थीने आता समृद्धीबाधीत शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

.शहरातील झोपडपट्टी धारकांना पि.आर.कार्ड मिळून देण्यासाठी देखील या बैठकीत चर्चा केली जाणार असल्याची माहिती गोरंटयाल यांनी दिली आहे.काल बावनकुळे जालना शहराच्या दौऱ्यावर असताना बावनकुळे यांनी गोरंटयाल यांच्या निवासस्थानी भेट दिली.या भेटी दरम्यान शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने बावनकुळे यांना निवेदन देऊन जालना-नांदेड समृद्धी महामार्गासाठी अधिग्रहीत होणाऱ्या जमिनीला योग्य मोबदला देण्याची मागणी केली असता बावनकुळे यांनी २१ ऑगस्ट रोजी याबाबत मंत्रालयात बैठक घेतली जाईल.असं आश्वासन दिल्याची माहिती गोरंटयाल यांनी दिली



# संपादकीय

## बहीण भावाच्या पवित्र नात्याचा सण

इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी ज्यांनी प्राणाची आहुती दिली त्या हुतात्म्यांचा स्मरण करण्याचा दिवस म्हणजे ९ ऑगस्ट अर्थात क्रांती दिन ! स्वातंत्र्यलढ्याची मशाल पेटवत देशातून इंग्रज राजवटीला नेस्तनाबूत करण्याची हाक देणाऱ्या तमाम ज्ञात अज्ञात क्रांतिवीरांना अभिवादन करण्याचा हा दिवस. इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य करण्याचा दिलेला शब्द न पाळल्यामुळे या आंदोलनाची सुरुवात झाली. ८ ऑगस्ट १९४२ रोजी भारताला स्वातंत्र्य देणार असल्याची घोषणा इंग्रज सरकारने केली होती मात्र ऐनवेळी भारताला स्वातंत्र्य देणार नसल्याचे इंग्रजांनी सांगितले. त्यामुळे महात्मा गांधींनी देशभर ऑगस्ट क्रांती आंदोलनाची घोषणा केली. या आंदोलनाला चले जाओ आंदोलन असेही नाव देण्यात आले. करो या मरो अशी घोषणा या आंदोलनात करण्यात आली. दीडशे वर्षे भारतावर राज्य करणाऱ्या इंग्रजांना देशातून हुसकावून लावण्यासाठी ९ ऑगस्ट १९४२ रोजी क्रांतीची ठिणगी पडली होती. ९ ऑगस्ट रोजी महात्मा गांधींसह अनेक ज्येष्ठ नेत्यांना इंग्रजांनी अटक केली होती त्यामुळे संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट पसरली होती. महात्मा गांधींच्या झालेल्या अटकेला विरोध करण्यासाठी संपूर्ण देश एकवटला होता. इंग्रजांनी नेत्यांची धरपकड केल्याने आंदोलन लोकांच्या ताब्यात गेले. देशभर जागोजागी हरताळ, मिरवणुका, मोर्चे यांना ऊत आला. सरकारने लोकांना एकत्र येण्यास बंदी घातली पण लोक सरकारचे आदेश मानायला तयार नव्हते. आंदोलक पोलिसांच्या लाठीहल्ल्याला, गोळीबाराला जुमानत नव्हते. जाळपोळ, पोलिसांचे खून, टेलिफोन व तारा कापणे असे प्रकार सुरू झाले.

जणू लोकांनी ब्रिटिश सत्तेविरूद्ध युद्ध पुकारले होते. संपूर्ण देश पेटला होता. दंगल, जाळपोळ, गोळीबार, रेल्वेचे अपघात, सरकारी कार्यालयांना आगी लावणे, सरकारी खजिन्यांची लुटालूट असे प्रकार सुरू होते. इंग्रजांच्या दडपशाही विरुद्ध संपूर्ण देश एकवटला होता. देशवसियांच्या एकजुटीने इंग्रजांना गुडघे टेकायला लावले होते. दुसऱ्या महायुद्धाने खिळखिळ्या झालेल्या ब्रिटिश सरकारची या आंदोलनामुळे उरली सुरली ताकदही लोप पावत चालली होती. त्यानंतर देशवासीयांनी इंग्रजांना भारतातून हाकलून लावे पर्यंत हे आंदोलन सुरूच ठेवले. भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य मिळाल्यापासून या आंदोलनात बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना श्रद्धांजली म्हणून हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन म्हणून साजरा केला जातो. मुंबईतील ज्या मैदानावर तिरंगा फडकावून या आंदोलनाची सुरुवत करण्यात आली त्या मैदानाला क्रांती मैदान असे नाव देण्यात आले आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात १८५७ नंतरचा हा सर्वात मोठा स्वातंत्र्य लढा होता म्हणूनच या लढ्याला भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात खूप महत्वाचे स्थान आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

पान १ वरुन

## दलित आदीवासी ...

सातबारावर जमिनीचे क्षेत्र 'पोटखराबी' मध्ये दाखवले जात आहे, त्यामुळे त्यांना शासकीय मदतीपासून आणि बँक कर्जापासून वंचित राहावे लागत आहे. यात दुरुस्ती करून क्षेत्र पूर्ववत करण्याची मागणी आहे.

योजनेची प्रभावी अंमलबजावणी: कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमानी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी.

घरकुल योजना: पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास, शबरी घरकुल आदी योजनांमधून उपेक्षित समाजाला प्राधान्य देऊन 'सर्वांसाठी घरे २०२२-२०२४' मधील तरतुदी लागू कराव्यात.

रामनगर प्रकरणी चौकशीची मागणी ॲड. मगरे यांनी जालना तालुक्यातील रामनगर, गट नंबर २०० येथील गायरान जमिनीसंदर्भात सुरू असलेल्या गैरकारभारावरही लक्ष वेधले. बोगस लाभार्थ्यांना सातबारा: या प्रकरणात उपविभागीय अधिकाऱ्यांकडे न्यायप्रविष्ट असताना, तहसीलदारांनी कसलीही चौकशी न करता २६ बोगस लाभार्थ्यांना सातबारा उतारा दिल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

आर्थिक व्यवहारामुळे विलंब: अनेक पात्र दलित लाभार्थ्यांनी दंड भरूनही, आर्थिक व्यवहार होत नसल्यामुळे त्यांना सातबारा उताऱ्यावर नोंद मिळालेली नाही. न्यायप्रविष्ट प्रकरणाचा निकाल: गट नंबर २०० मधील प्रकरण १० जानेवारी २०२० पासून न्यायप्रविष्ठ असून, उपविभागीय अधिकारी निकाल देत नसल्याने अनेकांना न्याय मिळत नाही. या सर्व गंभीर बाबींकडे महसूलमंत्र्यांनी लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी आणि पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी जोरदार मागणी ड. भास्कर मगरे यांनी केली आहे.

## जालना गणेश ...

उपस्थित राहणार आहेत. हे संपर्क कार्यालय स्व. कल्याणराव घोगरे स्टेडियमच्या बाजूला असलेल्या कॉम्प्लेक्समध्ये असून या फेस्टीवलमध्ये गेल्या पंचवीस वर्षापासून अंतराष्ट्रीय दर्जाचे कलाकारांनी हजेरी लावून आपली कला पेश केली आहे. तर हा फेस्टीवल म्हणजे जालनेकरांसाठी खास मेजवाणी देणारा ठरला असल्याचे सांगून श्री. आगलावे म्हणाले की, जालना गणेश फेस्टीवलचे हे २५वे वर्षे आहे. तरी आपण सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन जालना गणेश फेस्टिवलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखे पाटील, जालना गणेश फेस्टिवल २०२५चे अध्यक्ष अशोकराव आगलावे व सर्व संस्थापक पदाधिकारी यांनी केले आहे.

# भारतीय संस्कृतीतील रक्षाबंधन म्हणजे भावनिक सण - शकुंतला दीदी

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** भारतीय संस्कृती म्हणजे अनेक सण-उत्सवाची परंपरा त्यात रक्षाबंधन हा आगळा-वेगळा सण आहे ज्यामध्ये पवित्र बंधन, परस्पर स्नेहाने बहिण भाऊ बांधले जातात, हा भावनिक सण असून, परंतु आज आपण पाहत आहोत की काही बहीण-भावांचे प्रेम कमी होत आहे जे भाऊ-बहिण लहानपणी एकत्र राहत होते ज्यांच्यामध्ये प्रेम होते पण, आज कलियुगामध्ये त्याच भाऊ-बहिणीचे प्रेम कमी दिसत आहे.

तरीपण राखीला बहिणीला भावाची आठवण येते व ती ईश्वर शी हीच प्रार्थना करते हे ईश्वर तू प्रत्येक बहिण- भावाच रक्षण कर. हे रक्षाबंधन प्रत्येक घरा-घरात साजरी व्हावी मग ते हिंदू असो, मुस्लिम असो व इतर कोणीही.

आपण सर्वजण परमेश्वराची लेकरं आहोत, आणि आम्ही सर्वजण आपसात भाऊ-बहीण आहोत मग ते हिंदू असो तरी ती पराया धन असते, मुस्लिम बहिन असो तरी ती पराया धन असते . बहिण ही पराया धन असते,प्रत्येक बहिणीला राखी पौर्णिमेला भावाची आठवण येत असते

मग ती परकी असो किंवा आपली बहिण हि बहिण असते.

तर माझी प्रत्येक भावाशी अशी विनंती आहे की प्रत्येक रक्षाबंधनाला एक तर तू तुझ्या बहिणीच्या घरी जा किंवा तुझ्या बहिणीला तुझ्या घरी बोलावं व तुझ्या बहिणीचा आशीर्वाद घे बहिणीचा आशीर्वाद घेतल्याने प्रत्येक भाऊ आनंदात असतो. कोणताही सण परिवारासोबत साजरा केल्याने आनंद वाढतो. जर बहिणीला आई-वडील नसेल तर तिचे भाऊ वहिनी हेच तिचे आई-वडील असतात.

या संबंधित अनेक कथा आहेत. त्यापैकी यमाची कथा आहे,की जेव्हा आपली बहीण यमुना कडून यम राखी बांधून घेतो तेव्हा तो आपल्या बहिणीच्या माध्यमातून सर्वांना संदेश देतो की जे या रक्षाबंधनाचे पवित्र पालन करेल त्याला यमाच्या शिक्षेतून मुक्त होता येईल. म्हणजेच की तो दीर्घायुषी बनेल.



तसेच देवराज इंद्रजीत सुद्धा कथा सांगितली जाते की इंद्र आपले देवी साम्राज्य हरला होता. हतबल झाला होता तेव्हा त्याची बहीण इंद्रायणी ने राखी बांधून एका प्रकारचे बळ दिले होते.

आणि आपण सुद्धा एकच परमेश्वराची मुलं आहोत, या नात्याने आपण सर्व बहिण-भाऊ आहोत. यामध्ये कोणताही जाती धर्म - भेदभाव नाही, आणि रक्षाबंधनचे महत्त्व प्रचलित आहेत की बहीण आपल्या भावाकडे तिच्या संकट प्रसंगी तिच्या रक्षणाची सहकार्याची अलिखित मूकपणे अपेक्षा करत असते. जसे महाभारतामध्ये द्रौपदीने हरणाच्या वेळी कृष्णाला हाक मारली व भाऊ धावत येऊन निर्वस्त्र होण्यापासून तिचे संरक्षण केले तसेच भावाचे कर्तव्य असतेच की, रक्षाबंधनाच्या वेळी भावाने बहिणीचे रक्षण करावे हीच अपेक्षा. बहिण तिच्या भावाला दीर्घ आयुष्य मिळो, सुख-समृद्धी मिळो अशी ईश्वराला प्रार्थना करीत असते. जे भाऊ विदेशात असतात त्यांनाही मनापासून बहीण शुभ भावना संदेश देत असते.

परंतु आज आपण पाहतो की बऱ्याच बहिणी असुरक्षित आहेत, बंधनाच्या पवित्र दृष्ट प्रवृत्तीत बदल होत आहेत. श्रीमद् भागवत गीता मध्ये कंसाचे उदाहरण आपल्याला माहित आहे की त्याने बहिणीला मारण्यासाठी तलवार काढली होती जेव्हा बंध नाचे पवित्र डोक्यात येते, स्नेह कमी होतो , दृष्ट वृत्ती बनते तेव्हा तो भाऊ कसाई बनतो

आणि एखांदा कसाही सुद्धा उत्तम कर्तव्यनिष्ठ बनुन बहिणीचे रक्षण करू शकतो. रक्षाबंधनच्या निमित्ताने बहिण आपल्या भावाला राखी बांधताना आपल्यासारख्या देशातील सर्वांचे संरक्षण करीन दृष्टी, वृद्धी, पवित्र विश्वातील सर्व नारींकडे बहिणीच्या पवित्र नजरेतून पाहीन हा संकल्प प्रतिज्ञा करण्याचा राखी पौर्णिमा (रक्षाबंधन) देत असेच रक्षाबंधन प्रत्येक घरा-घरातून साजरी होवो हीच अपेक्षा बहिण १००-२०० ची भुकेली नाही तिला एकच आशा असते की भाऊ कुठेही राहो सुखी राहो प्रत्येक स्त्रीला दुर्गा, लक्ष्मी, देवी समजून तिचा सन्मान कर.

सद्भावना ठेवा व आनंदाने उत्सव साजरा करा.

# बदनापूर तालूक्यातील मांजरगावात धार्मिक स्थळाबाहेर प्रार्थनेनंतर हल्ला

## दोन महिलांसह सहा जण जखमी, तिघे पोलिसांच्या ताब्यात

**जालना । प्रतिनिधी -** बदनापूर तालुक्यातील मंजरगावात धार्मिक स्थळातून प्रार्थना करून बाहेर पडलेल्या व्यक्तींवर जमावाने अचानक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात दोन महिलांसह सहा जण जखमी झाले असून, यामध्ये चार ते पाच जण गंभीर जखमी झाले असल्याची प्राथमिक माहीती आहे..



प्राथमिक माहितीनुसार, धार्मिक स्थळातून प्रार्थना आटोपून बाहेर येत असलेल्या व्यक्तींवर तीन ते चार अज्ञात हल्लेखोरांनी अचानक हल्ला चढवला. घटनेत दोन जखमींना बदनापूर ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारांनंतर जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच बदनापूर पोलिसांनी घटनास्थळी तत्काळ धाव घेत परिस्थिती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तातडीने तिघा हल्लेखोरांना ताब्यात घेतले असून, इतर आरोपींचा शोध सुरू आहे. काही जण बाहेरून आले असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे पोलिसांना पाहून ते आपल्या मोटरसायकल सोडून पळून गेले असल्याची प्राथमिक माहिती समोर आली बदनापूर पोलिसांनी २० ते २५ मोटर सायकल जप्त केलेली आहे

घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला असून, बदनापूर पोलिस ठाण्यासमोर एका समुदायाची मोठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले. परिस्थिती हाताळण्यासाठी जालना पोलीस दलाची तुकडीही मंजरगावात दाखल झाली आहे. विशेष म्हणजे, या भागात यापूर्वी देखील दोन गटांमध्ये वाद झाला होता आणि पोलिसांनी तो मिटवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, पुन्हा एकदा अशा प्रकारची घटना घडल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

पोलिस निरीक्षक आणि वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी उपस्थित असून, परिस्थिती पूर्णतः नियंत्रणात ठेवण्यासाठी कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

# सत्यशोधक विद्यालयात रक्षाबंधनाचा कार्यक्रम संपन्न




**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** मानव विकास व पूर्णनिर्माण संशोधन संस्था, औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव ता. भोकरदन जि. जालना येथे आज दिनांक ९/८/२०२५ रोजी वार शनिवार दप्तर मुक्त शनिवार या उपक्रमांतर्गत रक्षाबंधन या सणानिमित्त रक्षाबंधनाचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला याप्रसंगी स्नेहा खोडके हिने इंग्लिश स्पिच करत रक्षाबंधनाचे महत्त्व सांगले गीता खरात हिने रक्षाबंधन वर कविता सादर केली. तसेच विद्यार्थिनींनी राख्या स्वतः बनविल्या. इको क्लब अंतर्गत एक पेड माँ के नाम वृक्षारोपण जोपासनाही यावेळी करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री सुनील वाकेकर तसेच संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्री बनकर यांचे मार्गदर्शन लाभले . याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

# जाफ्राबादच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही -महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**जालना । प्रतिनिधी -** राज्यातील जनतेसाठी राज्य शासन विविध लोककल्याणकारी लोकाभिमूख योजना राबवून गतिमान आणि पारदर्शक पद्धतीने काम करीत आहे. विकासाच्या संकल्पनेत जनतेचा सहभाग महत्त्वाचा आहे. प्रत्येक विकासाचे काम गुणवत्तापूर्ण होण्यासाठी त्याच्यावर लक्ष ठेवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. समाजाच्या शेवटच्या नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन काम करत असून, जाफ्राबादच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी निः संदिग्ध ग्वाही राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी दिली. जाफ्राबाद शहरातील ऐतिहासिक असलेल्या ४९ कोटी ४३ लाख रुपयांची पाणी पुरवठा योजना तसेच ५ कोटी रुपयांचे बसस्थानक बांधकामासाठी आणि ३ कोटी रुपयांची ई-बस चार्जिंग स्टेशन विकास कामांचा भूमिपूजन सोहळा आज पार पडला. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी खासदार डॉ कल्याण काळे, आमदार संतोष दानवे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, नगराध्यक्ष सुनिता लहाने आदींची उपस्थिती होती.

# राहुल गांधींचा मत चोरीवर बॉम्बस्फोट

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत अचानक वाढीव मतदानामुळे देशाचे राजकारण ढवळून निघाले.राहुल गांधीच्या टीमने गेले सहा महिने सदर प्रकरणावर अभ्यास करून मतांची चोरी कुठे कशी झाली ह्याचे राहुल गांधींनी पत्रकार परिषद भांडाफोड केली. निवडणूक आयोग व भाजप पक्षांची संगनमतामुळे भाजपला देशात राज्यात मतांची चोरी करून सत्ता स्थापन करण्यात यश आले. हे त्यांनी पुराव्यासहित जनतेसमोर मांडले.हा प्रकार लोकशाहीची मूल्ये पायदळी तुडवण्याचा व मतदारांचा विश्वासघात करणारा आहे.भाजपची बदनामी व निवडणूक आयोगाच्या कार्यशालीवर अविश्वास दाखवणारा आहे. निवडणूक आयोगाने राहुल गांधी याना प्रतिज्ञा पत्र सादर करा असे सांगण्याऐवजी निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांच्यावर कोर्टात अब्रुनुकसानीचा गुन्हा दाखल करावा.सुप्रीम कोर्टाने सदर बाब हि गंभीर असून त्याच्यावर स्वतः जातीने लक्ष घालून सत्य काय आहे हे देशातील नागरिकांसमोर येणे गरजेचे आहे.राहुल गांधी ह्यांच्या




म्हणण्यात सत्य आणि तथ्य असेल तर कोणत्याही पक्षाचे उमेदवार चोरीच्या मतदानाने निवडून आले असतील तर त्यांचे खासदार व आमदार पद रद्द करावे.त्या संपूर्ण कालावधीमध्ये त्यांच्यावर सरकारने जो खर्च केला असेल तो संपूर्ण व्याजासहित वसूल करणे.निवडणूक आयोगातील दोषी अधिकाऱ्यांना संविधानाची पायमल्ली केली असा आरोप ठेवून त्यांना पदच्युत करावे त्या काळातील त्यांच्यावर सरकारने केलेला संपूर्ण खर्च व्याजासहित वसूल करून त्यांना सश्रम कारावासाची शिक्षा केली पाहिजे.राहुल गांधी ह्यांनी केलेले प्रत्येक आरोप हे गंभीर स्वरूपाचे आहेत त्याची न्यायालयाने दखल घेऊन सत्य उघडकीस आणावे त्यात राहुल गांधी दोषी आढळले तर त्यांनी देशाची आणि जनतेची दिशाभूल करून निवडणूक आयोग व भाजप पक्षाला बदनाम केले म्हूून भरघोस दंडात्मक कारवाई करावी. नियमात जे बसेल त्या प्रमाणे त्यांना सश्रम कारावासाची शिक्षा झाली पाहिजे.प्रसामाध्यमानी सुद्धा सदर घटनेची सत्य माहिती जनतेसमोर मांडली पाहिजे. म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण, काळ सोकावता कामा नये.

**यशवंत चव्हाण सीबीडी, बेलापूर (नवी मुंबई ) मो.न. ९९२०७७६२७७**

## वाचकांचे मनोगत

### राजापूर एस.टी.डेपो इमारत धोकादायक म्हणून घोषित करा ?

रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील एस.टी. आगार इमारत मोडकळीस आली आहे.१९६० च्या दशकातील इमारत असावी इमारतीतील उपहारगृहाकडील बाजू मोडकळीस आल्याने उपहारगृह बंद ठेवण्यात आले ,कार्यालयाकडील भागाला तडे गेल्याने पावसाचे पाणी प्रवाशांच्या अंगावर पडते.गेली कित्येक वर्षे एस.टी.आगार प्रवाशांच्या सोईसाठी असलेले शौचालय, मुतारी नादुरुस्त आहे.राजापूर एस.टी. आगारात सतत प्रवाशांची वर्दळ असते.इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट झाले आहे की नाही. झाले असेल तर प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत कोणता निर्णय घेतला आहे.रत्नागिरी जिल्ह्यातील एस.टी.डेपो पैकी राजापूर हा मोठा डेपो आहे.परिवहन मंत्री,एस.टी.महामंडळ ,राजापूर एस.टी.आगार व्यवस्थापक मोडकळीस आलेल्या इमारतीची दखल घेऊन कार्यवाही करतील काय ?

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

# विलास खरात यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये जाहीर प्रवेश!



**जालना । प्रतिनिधी -** माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वाखाली मा.आ.कैलासशेठ गोरंट्याल यांच्या समर्थनार्थ व भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री.भास्कर आबा दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत सरपंच श्री. विलास खरात यांच्यासह कांता खरात, बबनराव खांडेभराड, श्रीधर खरात, लक्ष्मण खरात, संतोष खरात, विजय खरात, प्रदीप खांडेभराड, राम खरात, सुरेश खरात, ऋषींधर खरात, कैलास खरात, सोपान खरात, राजू खांडेभराड, ज्ञानेश्वर खरात, रवी खरात, बापू बोर्डे, विलास बोर्डे, कैलास केरकळ, मनदीप पन्नू, अंबादास खरात, व्यंकटेश खरात, देविदास खरात, गणेश खांडेभराड, बाबू पठाण, शिवाजी खरात, बबन खांडेभराड, भरत खांडेभराड, शुभम खरात, ज्ञानेश्वर खांडेभराड, जयाजी खांडेभराड, विष्णू खांडेभराड, ऋषी पंढरीनाथ खरात, राम दगडूबा खरात, कैलास गोविंदराव वानखेडे, प्रवीण आंभोरे, विठ्ठल जगन खरात, प्रदीप नामदेव खरात, राधेश्याम भगवान खांडेभराड, दत्ता श्रीराम खरात, राम चव्हाण यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.

या कार्यक्रमाला भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष श्री. भागवत बावणे, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रा. कपिल दहेकर, सरचिटणीस श्री. सुनिल पवार, ग्रामीण तालुकाध्यक्ष श्री. संजय डोंगरे, पूर्व जालना मंडळ अध्यक्ष श्री. अमोल धानुरे, शिवाजी शेजुळ, रोहित खोडवे, नागेश अंभोरे, सावळीराम मोहिते, सतीश केरकळ, गजानन खरात, राहुल पवार, शरद खरात, अरुण गडलिंग,तुळशीदास शेवाळे,राधेश्याम खरात, रमेश तिडके यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

या सामूहिक प्रवेशामुळे वाघ्रूळ परिसरात भाजपाची ताकद आणखी बळकट झाली असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश पक्षासाठी मोठा आधार ठरणार आहे.

# बदनापूरच्या विकासासाठी कटिबद्ध - भाऊसाहेब घुगे

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी बदनापूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक योजना आणि प्रकल्पांची घोषणा केली आहे. माजी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या सुसज्ज बसस्थानकाचा उल्लेख करत, घुगे यांनी आमदार अर्जुनराव खोतकर आणि आमदार कुचे यांच्या सहकार्याने सतत पाठपुरावा केल्याचे सांगितले. यापुढेही बदनापूरच्या विकासासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करत राहण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

प्रस्तावित विकासकामे आणि प्रकल्प:

औद्योगिक विकास: बदनापूरसाठी एमआयडीसी (Maharashtra Industrial Development Corporation) सुरू करण्याची मागणी त्यांनी नुकतीच उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली आहे.

पाणीपुरवठा: नदीजोड आणि धरणजोड प्रकल्पांच्या माध्यमातून शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्याचा प्रयत्न. तसेच, जायकवाडीहून थेट एक्सप्रेस बंद नलिकेद्वारे पाणीपुरवठा योजना राबवण्याचे नियोजन.

आरोग्य आणि शिक्षण: नागरिकांसाठी ट्रॉमा केअर सेंटर, तर विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषदेच्या शाळांचे डिजिटायझेशन.

पायाभूत सुविधा: बाह्य वळण रस्ता, सिमेंटचे पक्के रस्ते, पुलांची कामे, शेत आणि पाणंद रस्त्यांची कामे.

सांस्कृतिक आणि क्रीडा: कलावंतांसाठी सुसज्ज नाट्यगृह आणि क्रीडाप्रेमींसाठी क्रीडा संकुल, प्रत्येक गावात व्यायामशाळा, क्रीडांगण आणि वाचनालये सुरू करण्याचा आग्रह.

शेतकरी कल्याण: रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना निधी मिळवून देणे, पिक विमा योजना, अतिवृष्टी अनुदान आणि पीक कर्जासाठी प्रयत्नशील राहणे.

रोजगार आणि समाजकल्याण: मजुरांसाठी रोजगार हमी योजनेची (ROH-YO) कामे सुरू करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचा प्रभावी वापर करून मागासवर्गीय घटकांना लाभ मिळवून देणे.

या कामांसाठी शासन दरबारी सतत पाठपुरावा करण्याची ग्वाही देत, भाऊसाहेब घुगे यांनी बदनापूर तालुक्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपण सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले. या वेळी शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी कल्याणराव अवघड, भगवानराव मदन, कैलास दुधानी, ईश्वर पाटील जुंबड, प्रवीण फुके, अमोल दाभाडे, अंबादास कोळसकर, छायाताई जर्हाड, रामभाऊ दराडे आणि देवा ढाकणे उपस्थित होते.

# माहेश्वरी किशोरी मंडळाच्यावतीने ‘ट्रेझर हंट’ स्पर्धा उत्साहात संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** माहेश्वरी किशोरी मंडळातर्फे आयोजित ट्रेझर हंट म्हणजेच खजिना शोधा ही रोमांचक स्पर्धा उत्साहात पार पडली. किशोरी मंडळातील सदस्यांनी शहरातील ५० वेगवेगळ्या ठिकाणी खजिन्याचे संकेत लपवून ठेवले होते. प्रत्येक पथकाला कोडी सोडवून पाच ठिकाणांवरील संकेत शोधत शेवटी महेश भवन येथे पोहोचणे हे उद्दिष्ट देण्यात आले होते.


मनोरंजनासोबतच परस्पर मैत्री वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेल्या या उपक्रमात माहेश्वरी समाजातील सुमारे ६० लहान-मोठ्या सदस्यांनी सहभाग घेतला. विजेत्यांना माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष विजय गो. राठी, सचिव उमेश बजाज, प्रवीण मोहता, महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. विजया मोहता व पायल बाजाज यांच्या हस्ते बक्षीस प्रदान करण्यात आले. यावेळी किशोरी मंडळाच्या अध्यक्षा सौ. श्वेता बागडी, सचिव सौ. अदिती श्रीकांत काबरा, प्रकल्प प्रमुख प्रांजल ईश्वरलाल बांगड, वृंदा रवि झंवर, सदस्य साक्षी मोहता, मानसी मुंदडा, रोशनी मुंदडा, श्रेया सोमानी, पूजा राठी, जानवी मुंदडा, श्रुती बजाज, वैष्णवी लोया, कल्पना मनियार, मीनाक्षी मोहता, वेदांती मानधने यांच्यासह समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. भविष्यातही सामाजिक जबाबदारी पार पाडणारे उपक्रम हाती घेऊन जालना माहेश्वरी समाजाचा उत्तम प्रतिसाद मिळवू, असा विश्वास किशोरी मंडळाने व्यक्त केला.

# हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन करणार स्वातंत्र्यदिनी आंदोलन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** येथे हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनने विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवला आहे. अनेक विद्यार्थ्यांना अजूनही १००% मोफत पाठ्यपुस्तके मिळालेली नाहीत, याकडे संस्थेने लक्ष वेधले आहे. जर १२ ऑगस्ट २०२५ पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मिळाली नाहीत, तर १५ ऑगस्ट २०२५ (स्वातंत्र्यदिनी) रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर शांततापूर्ण धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा फाउंडेशनचे अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी दिला आहे.

हे आंदोलन लोकशाही मार्गाने शांततेत करण्यात येणार असून, या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. शेख अब्दुल रहीम यांनी शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण आणि वेदांत नगर पोलीस ठाण्याच्या निरीक्षकांना या संदर्भात निवेदन दिले आहे. मागील दोन महिन्यांपासून प्रयत्न- शेख अब्दुल रहीम यांनी सांगितले की, ते गेल्या जवळपास दोन महिन्यांपासून विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मिळावीत यासाठी प्रयत्न करत आहेत. या प्रयत्नांची दखल घेत समग्र शिक्षा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने छत्रपती संभाजीनगर आणि जालना येथील शिक्षणाधिकारी तसेच मनपा आयुक्तांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. शेख अब्दुल रहीम हे महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्य प्रवक्ते देखील आहेत. ते म्हणाले की, विद्यार्थी आणि शिक्षकांच्या हितासाठी लढा देणे हा गुन्हा असेल, तर मी हा गुन्हा वेळोवेळी करत राहीन.

# डॉ. सोमनाथ खाडे यांचा संचालकपदी निवड झाल्याबद्दल जालना येथे सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रीय सेवा योजना, जालना जिल्हा समन्वयक डॉ. सोमनाथ खाडे यांची नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे राष्ट्रीय सेवा योजना संचालकपदी निवड झाली. या यशाबद्दल त्यांचा जालना येथे युवा बहुद्देशीय सेवाभावी संस्था आणि राष्ट्रमाता अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी युवा बहुद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयपाल राठोड आणि राष्ट्रमाता अकादमीचे संचालक अनिलकुमार धारे यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ. खाडे यांचे स्वागत केले आणि त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच बोलताना जयपाल राठोड यांनी सांगितले की, डॉ. खाडे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत युवकांमध्ये सामाजिक भान, पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेबाबत जनजागृती घडविण्याचे मोलाचे कार्य केले आहे. संचालक पदावर त्यांची निवड ही जालना जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

# वाटूर फाटा येथे पारंपरिक तीज महोत्सवाचे आयोजन

## बंजारा समाजात उत्साहाचे वातावरण

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यातील वाटूर फाटा येथे बंजारा समाजाच्या वतीने पारंपरिक तीज महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले असून, या उत्सवात परिसरातील सर्व बंजारा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक मंडळाने केले आहे.

प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदाही पारंपरिक बंजारा समाजाच्या पोशाख, लोकगीत, नृत्य आणि बंजारा लेगी संस्कृतीचे दर्शन घडवणारा तीज महोत्सव साजरा केला जात आहे. महिलांचा विशेष सहभाग असून, तीज निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.


बंजारा संस्कृती जपूया, तीज महोत्सव साजरा करूया! या घोषवाक्याखाली होणाऱ्या या महोत्सवात सहभागी होऊन समाज एकतेचा संदेश देण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

उद्देश: गोर बंजारा संस्कृतीचे जतन करणे.

प्रमुख कार्यक्रम आणि तारखा: तीज पेराणी (पेरणी): शनिवार, ९ ऑगस्ट २०२५, दुपारी ३:०० वाजता, मोहन आडे यांच्या निवासस्थानी, बंजारा सदन, वाटूर फाटा येथे.

ढबोली (मेजवानी आणि मिरवणूक): रविवार, १० ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२:०० ते २:०० वाजेपर्यंत मेजवानी आणि दुपारी ३:०० ते ५:०० वाजेपर्यंत शंभू महादेव विद्यालय, वाटूर फाटा येथे भव्य मिरवणूक.

तीज तोडणी (तीज तोडणी): सोमवार, ११ ऑगस्ट २०२५, सकाळी ११:०० वाजता.



सर्व समाजातील सदस्यांना नम्र विनंती आहे की त्यांनी कुटुंब आणि मित्रांसह कार्यक्रमाची शोभा वाढविण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन समिती कडून करण्यात आले आहे.

## अखिल भारतीय अग्रवाल महासभा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची शपथविधी संपन्न

# प्रदेशाध्यक्षपदी सीमा पंच यांची फेरनिवड




**जालना । प्रतिनिधी -** अखिल भारतीय अग्रवाल महासभा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी मंडळाचा शपथविधी सोहळा ४ ऑगस्ट रोजी हिंगोली येथे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. सतीश अग्रवाल, आयटी मीडिया सेल प्रमुख किशोर गुप्ता व प्रवक्ते कमलेश अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

याप्रसंगी फेरा निवड झालेल्या महाराष्ट्र प्रदेश महिला अध्यक्ष सीमा अशोक पंच, सचिव शोभा अग्रवाल, प्रदेश कोषाध्यक्ष अनिता पित्ती, प्रदेश सांस्कृतिक मंत्री संतोष बगडिया, संघटन मंत्री पूनम अग्रवाल, ममता अग्रवाल (अकोला), मराठवाडा संघटन मंत्री डॉ. नीता बगडिया, मीडिया प्रभारी रश्मी केडिया (हिंगोली), जालना जिल्हाध्यक्ष ज्योती अग्रवाल, सचिव शितल धानवाला, सहकोषाध्यक्ष शुभा अग्रवाल, शहराध्यक्ष कोमल अग्रवाल, सहसचिव मीना अग्रवाल, वाशिम जिल्हाध्यक्ष अंजली अग्रवाल, सचिव सोनल अग्रवाल, हिंगोली जिल्हाध्यक्ष नीता कायल, महाराष्ट्र अध्यक्ष सपन बगडिया (हिंगोली), महाराष्ट्र उपाध्यक्ष दीपक अग्रवाल(अमरावती), विदर्भ प्रभारी पवन अग्रवाल (वाशीम), मराठवाडा सहयोजक सौरभ पंच, मराठवाडा सांस्कृतिक मंत्री सागर अग्रवाल, जालना जिल्हा प्रतिनिधी अनुप अग्रवाल, कोषाध्यक्ष परेश गजबी, जिल्हा संघटन मंत्री अनुज पंच, मीडिया प्रभारी बॉबी अग्रवाल, वाशीम जिल्हाध्यक्ष जीवन अग्रवाल, इंदू निमोदीया, लिला निमोदीया आणि इंदु भारूका आदींचा शपथविधी पार पडला. यावेळी सर्वांनी समाजाविषयी एकनिष्ठ राहण्याची, सामाजिक बांधिलकी जपण्याची आणि समाजाला संघटित करण्याची शपथ सर्वांनी घेतली.

याप्रसंगी सुशील गोपाल बजाज (हैदराबाद) यांच्या सुमधुर वाणीतून श्री बाबा रामदेवजी बाबा यांचा विशाल जम्मा जागरण पार पडला. या कार्यक्रमाला समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आगामी काळात होणाऱ्या निवडणुकांसाठी सज्ज राहावे - रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी कार्यालयात माजी आ. कैलासजी गोरंट्याल यांच्या समर्थक कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात अधिकृत प्रवेश केला. या निमित्ताने नवप्रवेशित कार्यकर्त्यांसह समन्वयक बैठक व हर घर तिरंगा यात्रेच्या नियोजन बैठकीचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

भाजपा कार्यालयात माजी आ.कैलासजी गोरंट्याल यांचे प्रथम आगमन झाल्याने त्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन भव्य स्वागत करण्यात आले. तसेच त्यांच्या प्रवेशामुळे आगामी काळात होणाऱ्या महानगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपाचा विजय अधिक भक्कम होईल, असा विश्वास दादांनी व्यक्त केला.

या बैठकीस माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी आ. कैलासजी गोरंट्याल, जालना महानगर भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, अक्षय भैया गोरंट्याल, भाजपा प्रदेश पदाधिकारी, नगरसेवक, मंडळ अध्यक्ष, महिला मोर्चा चे पदाधिकारी, भाजपा जिल्हा पदाधिकारी, मंडळ पदाधिकारी, मोर्चाचे पदाधिकारी तसेच असंख्य कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# विकासकामांवरून आजी माजी खासदारांमध्ये जुंपली

## दानवेंची क्षमता अधिक; त्यांच्या सल्ल्याने कामे करा- बावनकुळेंचा खा. काळे यांना सल्ला

**जालना । प्रतिनिधी** - जालन्याचे माजी खासदार रावसाहेब दानवे आणि विद्यमान खासदार कल्याण काळे यांच्यात विकासकामांवरील श्रेयवाद चांगलाच उफाळून आलाय. या श्रेयवादावरून रावसाहेब दानवे आणि खासदार कल्याण काळे यांच्यात चांगलाच कलगीतुरा रंगला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते जालन्यातील जाफ्राबादमध्ये पाणीपुरवठा योजनेचा भूमि पूजन शुभारंभ तसेच परिवहन महामंडळाच्या बस स्थानकाचं भूमिपूजन करण्यात आलं यावेळी आयोजित कार्यक्रमात दानवे आणि काळे यांच्यात महसुलमंत्र्यांसमोरच आयोजित कार्यक्रमात चांगलाच कलगीतुरा रंगला.

विकासकामं मि आणि आमदार संतोष दानवे मंजूर करून आणतो बातम्या मात्र रावसाहेब दानवेंच्या येतात. असं म्हणत खासदार कल्याण काळे यांनी माजी खासदार रावसाहेब दानवे यांना चिमटा घेतला.दरम्यान काळे यांच्या या प्रश्नाला उत्तर देत



रावसाहेब दानवे यांनी त्यांच्या भाषणातून खासदार कल्याण काळे यांच्यावर कुरघोडी केली. विकासकामांसाठी मि पैसे आणलेले आहेत असं सांगत कामे मि केली आहे त्यामुळे मि कामांवर जाणारच असं ठणकावून सांगत माझ्या प्रत्येक कृतीची बातमी होते असा टोला दानवे यांनी काळे यांना हाणला.मि तुमच्यावर टिका करणार नाही पण माझी बातमी आल्यावर तुम्ही भडभड करू नका असं आवाहन देखील रावसाहेब दानवे यांनी काळे यांना करत चिमटा घेतला.दरम्यान बाप बाप होता है,मि कसा जहरी नाग आहे हे सगळ्यांना माहीत आहे असंही दानवे त्यांच्या भाषणात सांगायला विसरले नाहीत.

दरम्यान बावनकुळे यांनीही त्यांच्या भाषणात दानवे आणि काळे यांना एकत्र बसून काम करण्याचा सल्ला दिला.

# अब्दीमंडीतील २५० एकर जमिन; ५०० कोटींचा घोटाळा

## वारसदारांचे आमरण उपोषण जाहीर, आत्मदहनाचा इशारा

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** - अब्दीमंडी, दौलताबाद (जि. छत्रपती संभाजीनगर) येथील २५० एकर जमिनीतील ५०० कोटी रुपयांचा कथित घोटाळा उघडकीस आला असून, या प्रकरणात दोषी अधिकारी अद्यापही मोकाट फिरत आहेत. जमिनीच्या मूळ वंशावळीप्रमाणे वारस असलेल्या व्यक्तींना न्याय मिळत नसल्यामुळे वारंवार मागण्या करूनही न्याय न मिळाल्याने वारसदारांनी मंत्रालय, मुंबई येथे दि. १२ ऑगस्ट २०२५ पासून आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला आहे. न्याय न मिळाल्यास दि. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी मंत्रालयासमोर आत्मदहन करण्याची चेतावणी दिली आहे.

**मुख्यमंत्री व म**

**हसूलमंत्र्यांकडे निवेदन**

या संदर्भातील निवेदन मुख्यमंत्री तथा गृहमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांना सादर करण्यात आले आहे. या निवेदनावर आरेफोद्दिन शेख (रा. अब्दीमंडी) व इतर वारसदारांची स्वाक्षरी असून, जी.पी.ए. धारक म्हणून किशोर खिल्लारे (प्रदेश सचिव व मराठवाडा अध्यक्ष, भाजप कामगार मोर्चा) यांचीही सही आहे.

**घोटाळ्याचा उलगडा**

मा. उच्च न्यायालय खंडपीठ मुंबई, औरंगाबाद यांनी प्रकरण अपील क्र. थ.झ. छे. ७९६८/२०२१ मध्ये जिल्हाधिकाऱ्यांना फाईल क्र. ७४/२०१६ व ३४६/२०१७ संदर्भातील शत्रूसंपत्ती मालकी हक्क प्रकरणाची चौकशी करून योग्य तो निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. परंतु तत्कालीन जिल्हाधिकारी अस्तिककुमार पांडे यांनी एकतर्फी निर्णय घेत गट क्र. ११, १२, २६, ३७, ४२ हे शत्रूसंपत्ती नसून मूळ मालक गुलामोद्दिन यांची जमीन असल्याचे मान्य केले. त्यानंतर गुलामोद्दिन यांच्या वारसांची चौकशी करून फेरफार व ७/१२ अंमलबजावणीचे आदेश दिले.

मात्र, गुलामोद्दिन यांचे वारस युसुफोद्दिन यांना दुर्लक्षित करून तत्कालीन अपर तहसिलदार विजय चव्हाण यांनी मोहम्मद रशिदोद्दिन यांच्या बाजूने एकतर्फी निर्णय घेतला. या भ्रष्टाचारात दुय्यम निबंधक गणेश राजपूत, मंडळ अधिकारी व महसूल विभागातील इतर अधिकारी सहभागी असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संगनमतातून मन्नू अग्रवाल, तन्वी अग्रवाल, अमरदीपसिंग सेठी, संजय चव्हाण व दर्शन सवईवाला यांच्या नावे रजिस्ट्री व फेरफार करून २५० एकर जमिनीचा सुमारे ५०० कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप आहे.

**सखोल चौकशी व कारवाईची मागणी**

या प्रकरणाचे पडसाद नागपूर येथील विधीमंडळात उमटले होते. त्यावेळी तत्कालीन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सर्व व्यवहारांवर स्थगिती देत खरेदीदारांचा पैसा कुठून आला याची चौकशी करण्याचे आदेशं दिले होते. परिणामी जिल्हाधिकारी अस्तिककुमार पांडे यांची बदली, तसेच अपर तहसिलदार विजय चव्हाण, दुय्यम निबंधक गणेश राजपूत व इतर महसूल अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते.

मात्र सध्या हे व्यवहार पुन्हा सुरू झाले असून, कोर्टात प्रकरण प्रलंबित असतानाही जमीन बळकावण्याचे प्रकार सुरू असल्याचा आरोप वारसदारांनी केला आहे.

**वारसदारांची मागणी**

युसुफोद्दिन व इतर वारसदारांनी वंशावळीच्या आधारे आपल्यालाही गुलाम ोद्दिन यांच्या जमिनीवर हक्क मिळावा, अशी मागणी केली आहे. या संदर्भात त्वरीत कारवाई करून जमीन परत मिळवून देण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.